
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५२८

REFBK-0024647
REFBK-0024647



**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.


(क्र. मा. पहा)

५०००-३-८४

धारा प्रकाशन

– डॉ. सुहासिनी इर्लेकर यांचे ग्रंथप्रकाशन

- ‘तृप्ती’ ( कविता ) १९६१
  कुलकर्णी ग्रंथागार, पुणे
- ‘चित्रांगण’ ( कविता ) १९७२
  संपादन, म. सा. प. औरंगाबाद
- महदंबेचे धवळे ( सं.) १९७७
  आध्यात्मिक साहित्य प्रकाशन, हैदराबाद
- यादवकालीन मराठी काव्य समीक्षा १९७९
  धारा प्रकाशन, औरंगाबाद
- प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य १९८०
  परिमल प्रकाशन, खडकेश्वर, औरंगाबाद
- जनाबाईचे निवडक अभंग एक चिंतन : १९८१
  जोशी ब्रदर्स, औरंगपुरा, औरंगाबाद




REFBK-0024647
REFBK-0024647

धारा प्रकाशन १९८४ पहिली आवृत्ती / विजया दशमी १९८४


प्रकाशिका – आशा बाबा भांड, साकेत, ११५ म. गांधी नगर,
स्टेशनरोड, औरंगाबाद

मुद्रक – व्यवस्थापक, जयहिंद मुद्रणालय, औरंगाबाद

मुखपृष्ठ / रेखाटने / गणेश विसपुते

© यशवंत ब. इर्लेकर, ॲडव्होकेट, 'अक्षर',
२७५ नवगण कॉलेज कॉलनी,
बार्शी रोड, बीड ४३११२२

किंमत वीस रुपये



श्रीमती लता मंगेशकर
श्री. हृदयनाथ मंगेशकर
यांना प्रेमपूर्वक



# अनुक्रम


१ अक्षर / १
२ उदबन / २
३ संभ्रम / ४
४ गांधारी / ५
५ उंचावून ओसरणाऱ्या
लाटांचे / ६
६ डोळ तुझे असे की– / ७
७ लक्ष / ८
८ स्वप्नबंध / ९
९ पत्र / ११
१० अंधारसूक्त / १२
११ मनोमन / १४
१२ खंत / १५
१३ पथदीप / १६
१४ ठच / १७
१५ मुक्त केले / १८
१६ आवाहन / १९
१७ थेंब थेंब पावसात / २०
१८ आला पंचमीचा सण / २१
१९ मी तुझ्या डोळ्यांत
जव्हा / २२
२० हे झाड / २३
२१ दार / २५
२२ देण / २५
२३ फुलझाड मोहरून / २६
२४ एक कळी / २७
२५ तेव्हा गाणे जुळून येते / २८
२६ येऽना / २९
२७ अभोगी / ३१

२८ रूपांतर / ३२
२९ भगवे मौन / ३३
३० निष्पर्ण देठ / ३४
३१ थडगे / ३५
३२ पहाटेच / ३७
३३ अग्निफूल / ३८
३४ काळा निवान्त / ३९
३५ महानगर / ४०
३६ गाथा / ४३
३७ चंद्रकंस / ४४
३८ कुणि पाहिलेच नाही / ४५
३९ जुळलेत कधीच धागे / ४६
४० धुंद ही हवा / ४७
४१ त्रिवार नाही / ४८
४२ वेदनांचा वेद / ४९
४३ गुणगुणून / ५०
४४ प्रतीत / ५१
४५ युगान्त / ५३
४६ वस्ती / ५४
४७ तोवर / ५७
४८ पूर्णविराम / ५८
४९ आकाशाच्या अभिप्रायार्थ / ५९
५० शिशिरान्ती / ६१
५१ त्या पिंपळपाराभवती / ६३
५२ तुम्हाला कोणते गाणे गाऊ पाखरांनो / ६५




मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५५२०
शाखा (स्थळ प्रत)

# अक्षर

मी लिहीन म्हटले, खरेच पण सांगू का तुजला ?
तो चंद्र बदामी हंसतो आणिक पुसतो मजला–
"तू सांग चांदणे कसे झेलशिल झिरमिरणारे
ह्या उभ्या आडव्या रेषा टिबांच्या जाळीतुन ?"

कसे स्पर्शशिल आकाशातिल सुनील मार्दव ?
कसे हुंगशिल मेघांमधले श्रावणआर्जव ?
कसा साहशिल सूर्याचा जरतार पिसारा ?
कसा शोधशिल वादळवाऱ्यातून किनारा ?

ती हिरवी लवलव......त्यावर ती फुलपंखी मलमल......
तो थरथरती वलये पाण्यावर सोज्वळ...
ते सोनउन्हाचे अंगांगांना बिलगुन जाणे......
शब्दांकित करशिल कसे बरे हे गोड उखाणे ?"

मी लिहिले नाही ! लिहिले न कधीही असते.
तो चंद्र बदामी हसतो आणिक वदतो मजला
"हे असे चांदणे झेलायाचे झिरमिरणारे
ह्या उभ्या आडव्या रेषा–टिबांच्या जाळीतुन"

# ऊदबन

उभी आहे न्हाऊन इथे
उदी केस उबवताना
पाहतेय एक सूर्यपक्षी
चोचीत किरण घेऊन येताना

उमलताहे पहाटफूल
प्रकाशलाटा ओसंडून –
फुटताहेत माथ्यावर
नि वक्षांवर ओठंगून

कुणाचा हा स्पर्शप्रकाश
गात्र गात्र लपेटणारा ?
कुणाच्या निःश्वासार्थ
माझा श्वास हुंकारणारा ?

हे मंद मंद पदप
स्थितप्रज्ञ धर्माचे की –
आलिंगावे असे बाहू
धनुर्धर पार्थाचे ?

पीळ तसूतसूतला ...
उधाण नसानसातले ...
कुणाचे ? भीमाचेच ? की –
नकुल वा सहदेवाचे ?

कोण तू कवचकुंडल
मिरवीत गेलास पथावरून ?
अंतर्हेत जाणूनच ना –
दाहक असा गेलास हंसून ?

हंसून गेलास तसा ...
मी उमलताच मिटून गेले !
अंग अंग निथळताना ...
ऊदबन पेटून गेले !

## संभ्रम

असे कसे इथे मला डोंगरांनाच घरलेले
मावळतीचे नभ हवे हवे असे झुकलेले
मातीही विरघळून मऊ साय झालेली,
वाऱ्यानेच दिशाभूल करून इथे आणलेली
इथे तिथे गुलमोहर उभ्यानेच पेटलेले !
मावळतीचे नभ हवे हवे असे झुकलेले.

वाट तरी कशी अशी ओढाळच झालेली ?
माझी पाउले तिच्या प्रवाहात विरलेली ।
वृक्षांवर पक्ष्यांनी तसे यमक रचलेले !
मावळतीचे नभ हवे हवे असे झुकलेले.

कशी बोलू ? बोलणेच गीत होऊन येते
कशी चालू ? चालणेच चित्र होऊन जाते.
असे कसे पिसे देऊन एक वेड लपलेले ?
मावळतीचे नभ हवे हवे असे झुकलेले.

# गांधारी

डोळे. डोळ्यात नसणारे. गिचमिडणारे.
चिवट. चिवचिवणारे. चिकट गाळणारे.
घोंघावणारे. शोधणारे अखंड. न विसावणारे.
हैराण. डोळे वैराण. रेताड तडकणारे.

त्याचे असे डोळे ! डोळे न बघणारे.
परतफेडीत मात्र तिचे डोळसपण शोषणारे.
डोळे दक्ष. तिचा शब्दवेध घेणारे,
डोळे लक्ष प्रश्न. कधीही न संपणारे.

प्रश्न ! भेदक. आक्रमक चाचपडणारे
उत्तर. निमूट. निपचित. थिजवणारे.
प्रथम प्रश्न. मध्ये प्रश्न. अखेर प्रश्न. प्रश्नच प्रश्न !
तिची बुजरी उत्तरे वांझ ठरविणारे आंधळे प्रश्न.

अखेर ती घेते गांधारीचे व्रत.
धृतराष्ट्राचे सारेच प्रश्न आटतात.
ती रुजते अंधारात, फुलते ठेचकाळत,
तसे अंधारवेलीला शंभर देठ फुटतात.

# उंचावून ओसरणाऱ्या लाटांचे

उंचावून ओसरणाऱ्या लाटांचे
काठ कधी तोलू नयेत,
गर्भगर्द रेशीम अंगांचे
स्पर्श कधी जोखू नयेत.

पाहू नये वळून वळून
किती सागर आलो तरून,
नभात तारे, शिडांत वारे
श्वासांत सूर घ्यावे भरून.

जाळे टाकून बसावे सक्त
इथे तिथे पेरून भान,
फुलून मिटून, मिटून फुलून
निळे ल्यावे फक्त प्राण.

बुंद बुंद ओटी भरून
मोती घ्यावे मनोमन,
चमचमणाऱ्या लाटांतून
फुटत जावे क्षणोक्षण.

## डोळे तुझे असे की—

डोळे तुझे असे की
डोळेच फक्त व्हावे,
डोळ्यांत साठवूनी
डोळ्यांत आठवावे.

डोळ्यांत मोर त्यांना
फुटती असंख्य डोळे,
डोळ्यांत डोळसांना
दिसतात फक्त डोळे.

डोळे तुडुंबलेले,
डोळे झपाटलेले,
डोळे मिटून डोळे
डोळ्यांस हुंगणारे.

होऊन पापणी ह्या
डोळ्यांवरी झुलावे,
डोळे तुझे असे की
डोळेच पांघरावे.

## लक्ष

लक्ष जन्म घेतले मी
तेव्हा लाभले हे मन,
लक्ष साहिली वादळे
तेव्हा लाभला हा क्षण.

लक्ष क्षणाची स्पंदने
त्यांत एक भोगताना
लक्ष जुळविल्या ओळी
फक्त एक लिहिताना.

लक्ष लक्ष संवेदना !
त्यांत हीच प्रकटली
तीही फुलताना अशी
लक्ष शब्दांत फुटली.

शब्दाशब्दांत बिलोऱ्या
लक्ष रूपे बिंबताना
लक्षिली मी लक्षवेल
नक्षत्रांस स्पर्शताना

# स्वप्नबंध

घराघरांतील जेव्हा
पेंगुळते कुजबूज
अशा क्षणीच माझिया
पापणीला येते जाग.

मज नित खुणावते
निळे सावळे आभाळ
मीही अलगद जाते
तरुनिया अंतराळ.

सख्या चांदण्यांचा मेळा
येतो ठुमकत गात
फेर धरूनी नाचती
चंदनाचे गोर हात.

प्रकाशाचे गीत गात
मीही बनते चांदणी
मला खेचू न शकती
मर्त्य जीविताची गाणी.

तेव्हा जळत्या श्वासांची
भाजतें न मुळी धग
जाणवेना ढळणाऱ्या
स्वप्नमनोऱ्यांचा वेग.

रासक्रीडेत नकळे
कधी दिशा उजळती
कधी खटचाळ सख्याही
लुप्त जागोजाग होती.

अग्निपथावर तेव्हा
एकाकी मी बावरते,
साद घालीत सख्यांना
जेव्हा बेभान धावते –

खोल खोल दरीतून,
तरंगत्या धुक्यातून,
कोण कोमल तांबूस
कर देते उंचावून ?

कुणाचिया श्वसनांना
खुळचा मातीचा ये गंध ?
कुणाचिया लोचनांचा
असते मी स्वप्नबंध ?

# पत्र

आर्त गर्द निळी शाई
निळा नितळ कागद
लेखणीच्या अग्रावर
थेंबलेले शब्द अब्द.

उभी उजव्या हाताशी
एक दक्ष गंधस्मिता,
ओणवून पाहणारी
डावीकडे दीपांकिता.

पुढ्यातच स्वरजाळे
गुंफणारी नभोवाणी
कुणी अथांग मनाने
संथ छेडिते विराणी.

थेट दृष्टीपुढे तुझे
लटकते छायाचित्र
तुला लिहिताना माझे
मेघमल्हारले नेत्र.

# अंधारसूक्त

हा अंधार आहे म्हणून जग जगत आहे.
न उमलताच उन्मळणाऱ्या कळ्यांचे निःश्वास,
दिशाहीन भटकणाऱ्या विमनस्क वायुलहरी,
विश्रांतीची अंडी उबवणारी कुबट ओंगळ घरटी,
कामकरी आईला लुचणारे दुधाळ स्वप्न,
नि स्वप्नस्थ जगाला तुच्छ लेखणाऱ्या–
स्थितप्रज्ञांच्या वांझ प्रार्थना
अंधार अथांग आहे.

अंधारातच जीर्ण झोपडी हसू शकते
दात विचकीत काळ्या प्रासादांना,
तेव्हा वीतभर खळगीने आपले–
लाल डोळे वटारलेले नसतात.
भेसूर दिसते जग प्रकाशात.
लक्तरे झालेल्या मनांना
डोळे फोडून घेता न आले–
तरी मिटता येतात.
अंधार कनवाळू आहे.

अंधारातच वरात मिरवीत जाते
भग्न आशा आकांक्षांची
विटक्या पडद्यावर रोषणाई सजते
हळव्या अतृप्त स्वप्नांची;
पण तेव्हा पापणी उघडायची नसते–
दुबळे पोरटे झोपेत कण्हले तरी.
अंधार रम्य आहे.

अंधारातच गजाआडचा मृत्युकैदी
संपलेले जीवन पुन्हा जगून घेतो,
फास आवळणारी पहाट येण्यापूर्वीच
जीवनाचा कडू चोथा थुंकण्याचे बळ
फक्त अंधारच त्यास देऊ शकतो.
अंधार अमर आहे.

कुठे तरी अंधारात
उसना शृंगार कण्हत असतो,
कुठे तरी अंधारात –
लूत भरलेले दु:ख रडत असते.

कुठे तरी अंधारात –
मृत्युशय्या घरघरत असते.
त्या सर्वांची कैफियत –
अंधार निमूट ऐकून घेतो.
अंधार चिरंजीव आहे.

## मनोमन

तार तुटली म्हणून कधी सूर उडून जातात ?
ओठ मिटलेस जरी, तरी शब्द मिटून जातात ?

अजून तुझे नभ खुळे निळे निळे जसे तसेच
सांजसकाळ खुणावणारे क्षितिजफूल अजून तुझेच.

ओळखलेस डोंगर तें सतत गूढ हंसणारे ?
गळ्यात हात गुंफून हे झरे मन ओढणारे ?

अशा प्रवाहात तू तुझी तुलाच लोटून दे
कंठ विसरून एक धून अंधारात पेरून ये.

कणाकणातून दिसेल मनोमन उगवलेले
पंख लेऊन एक गीत निळाईत उतरलेले.

# खंत

खंत मला याची ना
इवले दिधलेस पंख,
खंत हीच उडता मी
गगना होईल डंख.

खंत नसे तू मलाच
इवलाली चोच दिली,
सांग कशी स्पर्शावी
तूच फळ निर्मियली ?

खंत न मज वाटे की
इवलाले माझे घर,
खंत मला याची, मी–
भारभूत वृक्षावर.

खंत मुळी वाटते न
रात्रदिन समराची,
खंत, किती वाहशील
चिन्ता गा विश्वाची !

## पथदीप

झरणारे छायेचे अवनीवर सूर असे
वृक्षांनीही धरिले मौनाचे वलय तसे . . .
संपवून गगनाची यात्रा खग थकलेले,
कोटरांत शब्दांना साकडेच पडलेले !

रंग कुठे, गंध उठे. सुमने तर सुकलेली,
तकतकीत पानांची लय कधीच मिटलेली
सुकलेल्या गवतातून भयद थंड स्पर्श फिरे,
झुडुपांचे आर्तगीत किरकिरते एकसुरे.

पाचोळा पानांना दावितसे भय पांढुर
डोहाची भेदरली नजर थिजे काठावर.
मंतरल्या माळावर पायवाट चुकलेली,
एककाजव्यास मात्र व्यथा तिची कळलेली !

# ठेच

अशी ठेविते मी पाय
घरउंबऱ्याबाहेर –
तोच पुसतसे कुणी
'कुठे जाशी लगबगं ?

थबकतेच क्षणाशी
मागे वळून चौफेर –
पाहता, न आत कुणी
कुणी दिसेना बाहेर !

'कुठे निघालीस ?' मग –
मीच हटकते मला ;
हाय ! क्षितिजाची ठेच
माझ्या पांगळ्या दिठीला.

# मुक्त केले

मुक्त केले जा तुला वचनांतुनी
यापुढे तू कोण आणिक मी कुणी !

मोकळा आता गळा शपथांतुनी
शपथ रे नसशील माझा तू कुणी.

त्या तिथे वळणावरी रेंगाळुनी
वळुनि पाहिल का, कशासाठी, कुणी ?

मोकळ्या केसांत न्हालेली फुले
सांडता, वेचून न्यावी ना कुणी !

लाजऱ्या गुल्मोहरांचे फुलोरे
झेलुनी हृदयी झुरावे ना कुणी

श्रावणाच्या गडद हंसऱ्या सावल्या
वाहत्या पाण्या न हटकावे कुणी.

पाहुनी कोणास गाताना कुणी
लोचनी आणू नये पाणी कुणी !

# आवाहन

ये अशी गीतात माझ्या होउनी तू रागिणी
गा सखी श्वासांतुनी तू माझिया प्राणांतुनी,
तूच माझी स्पर्शवीणा, तू तियेचे कंपन
तू स्वरांचा साज, आरोहातले आरोहण;
ताल तू, लय तूच, तू ती उन्मनी आवर्तनी.

ये अशी कवनांत माझ्या होउनी संवेदना
तूच शब्दांची व्यथा अन् तू कवीची वेदना,
कल्पनेचे पंख तूची शाश्वता आश्वासन
रंग-गंधातील सौंदर्यास तू आमंत्रण;
तू कवी, कविताही तूची, तू तुझी आस्वादिनी.

ये अशी ग्रीष्मात वर्षा होउनी आवेगिनी
माझिया माळावरी जा सिंचुनी संजीवनी,
चित्र तू चैत्रातले अन् श्रावणी लावण्य तू
अश्विनाचा श्वास तू, माघातले कारुण्य तू;
ये गडे आलिंगनी जाळीत ये सौदामिनी.

येई माझ्या अर्चनी तू होउनी आराधन
अंतरी आतूर माझे तूच एक निवेदन,
फूल तू, फुलपंख तूची अन् फुलांचे स्वप्न तू
आसवांचा भास तू, भासांतला निश्वास तू;
आर्त मी, तू आरती आरास हो गा लोचनी,
गा सखी श्वासांतुनी तू माझिया प्राणांतुनी.

## थेंब थेंब पावसात

थेंब थेंब पावसात
गेंद गेंद आठवांत
चिंब होउनी मनात
येऊ ऽऽ नको ऽऽऽ येऊ ऽऽ नको ऽऽऽ

एकलीच मी घरात
सांज अशी ही भरात
शब्द होउनी तशात
बोलू ऽऽ नको ऽऽऽ बोलू ऽऽ नको ऽऽऽ

बोलले तरी तयात
हासण्यात पाहण्यात
सहज स्पर्शण्यात हेत
शोधू ऽऽ नको ऽऽऽ शोधू ऽऽ नको ऽऽऽ

शोधशील .. शोधशील
बोलणे न बोलशील !
गुंतशील – गुंतवून
जाऊ ऽऽ नको ऽऽऽ जाऊ ऽऽ नको ऽऽऽ

# आला पंचमीचा सण

आला पंचमीचा सण ओल्या मेंदीच्या पायांनी
चुडे भरल्या हातांनी

उंच उंच झाडांवर झोके झुलती झोकात
फांदी वाकते तालात.

गेल्या सासुरवाशिणी, आल्या लेकी माहेराला
तीर्थरूप प्रयागाला.

एक सासुरवाशीण सून वळे फुलवात
दिठी चोरटी दारात.

येते गाडी जाते गाडी, गाडी दारात थांबेना
फुलवात का फुलेना ?

थेंबथेंब आसवात तेलवातही भिजली
सहाणही पाझरली.

'लावि देवापुढे दिवा, सांजावले सूनबाई,
गहिवरली समई.

लखलखला देव्हारा आली भुलई रंगात
चुरचुरे फुलवात.

गेला पंचमीचा सण मेंदी रंगल्यावाचून !
चुडे भरल्यावाचून !

## मी तुझ्या डोळ्यांत जेव्हा

मी तुझ्या डोळ्यांत जेव्हा रूप माझे पाहिले,
पाहिले ना पाहिले तो पापणीने झाकिले.

नाकळे मी हासले की नाचले आनंदुन !
नाठवे जे बोलले काही खुळे मौनातुन
मी तुला की तू मला... ...रे सांग कोणी जिंकिले ?

हे तुझे डोळे निळ, झाले शिकारी की शिकार ?
अंगप्रत्यंगात कोणी ओतिले जहरी विखार ?
मी तुझ्या . .. की तूच माझ्या हात हाती गुंफिले ?

चाललो वाटेवरी, ते जाहले तारांगण !
नाचलो बांधून पायी चांदण्यांचे पैंजण...
मी तुला .....की तू मला..... चुंबून गाणे गायिले !

हे झुले आभाळ भाळी, ह्या दिशा मनमोकळ्या
सुटत गेल्या मनकळीच्या पाकळ्यांतून पाकळ्या !
ने जिथे नेशील तेथे स्वर्ग माझा यापुढे !

## हे झाड !

आणि दिशाचक्रातून

अलगद उतरलेले

हे झाड !

जणू हवा गावचेच नाही

अशा थाटात.

सावध नजर.

दक्ष पंख.

कोणत्याही क्षणी झेपावेल –

असे

बेभरवशाचे !

## दार

जेव्हा उजाडताना जाईल मावळून,
तेव्हा तुझ्याच दारी मी थांबले असेन.

काहीच मागण रे माझे तसे नसेल,
द्यावे असे कुठूनी तुजपाशीहि उरेल ?

मिटले ? नकोच उघडू क्षण एकही परंतू–
तेथेच तिष्ठत....तसा असशील ना प्रिया तू ?

बेबंद दार तेव्हा होऊन पारदर्शी
स्पर्शांतुनी कहाणी सांगेल भावदर्शी.

तेव्हा उजाडताना आयुष्य मावळेल,
ते एकदाच डोळे उघडून कोसळेल.

# देणे

'बरे झाले !
हळवेपण डोळ्यांतून गळले नाही.
बरेच झाले–
शब्दांना पाझरही फुटले नाहीत.
नव्हताच अर्थ !
काव्य, शास्त्र, विनोद सारी निमित्तेच !
शब्द ? खेळ !
रंग गहिरे ओतून फक्त फुलवायचेच !
नको होती–
तुला, मला, तशी ओढच वाटायला
नकोच होते
अंधारात अवेळी भेटायला.
झाले ... गेले ..
तूच सांग, तसे आपले काय गेले ?
चार जणे करतात–
तसे आपले संसार नाही झाले ?
असेच बघ–
अधून मधून डोळे येतात उगाच भरून.
शपथ रे !
सुखानेच मन आलंय गहिवरून.
येतोस तू ?
पुन्हा भेट ? तसा काय नेम आहे ?
गेल्या जन्मीचेच
अजून देणे किती उरले आहे !

# फुलझाड मोहरून

वाटेवरी तुझ्या ना आलो कधी चुकून
गेला कुणी जरी ना आला कधी तिथून !

ऐकून मात्र होतो कुजबूज जिवलगांची
स्वप्नांतही बिचारे असतात गांगरून !

आधीच भाबडा मी. हळवा, सरळ मनाचा,
आलो इथे तयांनी मज धाडिले म्हणून.

पढवून ठेविले मी कितीदा कळ्या–फुलांना
फुलपाखरेच त्यांची झाली तुला बघून !

उडवीत कुरळ भाळी, डुलवीत कुंडलांना
गेलीस प्राण माझे झेलीत मजपुढून !

तू पाहिलेस–माझी स्वप्ने फुलून आली;
हंसलीस–तेही गेले हृदयात दरवळून !

पदरावरील नक्षी ? फुलहार वक्षीचा की ?
मेंदीत रंगलो मी पक्षी खुळा बनून !

तू बोललीस काही ? मी ऐकले कुठे ग !
होतो तिथेच आहे फुलझाड मोहरून !

# एक कळी

एक कळी
नभ ल्याली
दंव पिऊन
लाल झाली.

एक पक्षी
पानांत दडून
शीळ घालतो
फिरून फिरून.

एक ढग
फुलून फुलून
घुमू लागला
डुलून झुलून.

एक बाळ
बघते आहे
डोळयांत नभ
झुलते आहे.

# तेव्हा गाणे जुळून येते

शब्दांतल्या स्वरांची जेव्हा पहाट होते,
माझ्या मनात तेव्हा गाणे जुळून येते.

आलिंगुनी फुलांना जाती कळचा फुलून
पानांवरी तयांचा ये रंग साखळून
पंखातल्या नभाला छंदात जाग येते.
माझ्या मनात तेव्हा गाणे जुळून येते.

तारुण्य लेवुनी हे लावण्य ये कुठून ?
झुकवून पापण्याचे कुणी पंख पालवून
पायांतळी कुणाच्या कुणी प्राण अंथरीते,
माझ्या मनात तेव्हा गाणे जुळून येते.

गाण्यांतले दिवाणे गातात प्रेमगाणे
करिती किती बहाणे – किती घालती उखाणे !
शब्दांतुनी शहाणे तें स्पर्शवेड होते,
माझ्या मनात तेव्हा गाणे जुळून येते.

कोणी कधी कुणाची पाहून वाट थकते
कुणी चोरपावलांनी येते, तसेच जाते,
कुणी हंसत हंसत येते, हृदयात रुतून जाते,
माझ्या मनात तेव्हा गाणे जुळून येते.

## येँ ऽ ना ऽऽ

ये ऽ ना ऽ ऽ
तू ऽ ये ऽ ना ऽ ऽ

गेले थकून
डोळे मिटून
मनात मन उरले ना,
ना जनातही
विजनातही
मी तुझ्यात उरले ये ऽ ना ऽ ऽ

चमचमणारे
जळ निळे निळे
भुलले खुळचा आभाळाला,
लवलवणारे
जळी लव्हाळे
बघ खुणावती, तू ये ऽ ना ऽ ऽ

आल्या कुठून
लाटा उठून
फुटल्या काठाकाठांना,
घुटमळणारे
उठवळ वारे
डसले रानारानांना ये ऽ ना ऽ ऽ

गेल्या सुटून
नावा इथून
भिडल्या वाटा वाटांना,
किलबिलणारे
भिरभिरणारे
वळले घरट्याघरट्यांना ये ऽ ना ऽ ऽ

केशर उन्हात
जांभुळ बनांत
वणवणते अनवाणी ना !
हाती धरून
गाणी म्हणून
नवख्या नगरीला ने ना ये ऽ ना ऽ ऽ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# अभोगी

आता या निर्वाणीच्या स्वरवलयांत
माझ्या श्वासांची द्रुतलय आहे,
आणि अभोगीच्या लयविलयात
माझेच प्राणप्रलय आहेत.

त्या निगूढ घनदाट क्षणबनात
सावल्या नि:शब्द पांगल्या आहेत,
अन् झिंगलेली सतार ! झिणझिणत्या झुल्यावर
अभोगीचे सूर झुरत आहेत.

कोणत्या अबोध भोगलालसेने झेपावताहेत–
पिसाट लाटा किनाऱ्याकडे मनाच्या ?
मनच मनात असे ठिपकताना ?
त्या आकाशगंगेच्या तीरापलीकडील
कर्पुरबनात पेटणाऱ्या चंद्रज्योती
माझ्या–फक्त माझ्याच डोळ्यांच्या सावल्या आहेत.
का अभोगीनेही असावे अखेर असे भोगासक्त ?
श्वासमुक्त वेदनांचेही का व्हावे जीवनामृत ?
वाटते...वाटते ..इथेच...
असेच...
या क्षणीच...
फेडून ठेवावे हे शरीर अभोगीच्या काठावर !
अनादी वेदनांच्या हिमनदीत
अलगद उतरण्यापूर्वी...

# रूपान्तर

माती माखून अंगाला
उभे असे एक घर,
अंतर्बाह्य मातीचे
त्याचे मातीचेच छप्पर

मातीच्या घरात त्या
मातीचे हात रांधणारे,
मडक्यातून काही बाही
मातीमोल शिजणारे.

मातीच्या शरीरांना
मातीची मनं लोंबणारी,
दिवसा दडून, अंधारात
कबंधंच वावरणारी

उजवीकडे उकीरड्यावर
सृजनाची अहोरात्र संथा,
डावीकडून लगटणाऱ्या
काही सार्वजनिक संस्था

अशा घरात जाऊ नये.
मी एकदा गेले आहे,
तेव्हापासून मातीचेच
डोळे घेऊन फिरते आहे.

# भगवे मौन

आज भगवे मौन फेडून
नभ गात सुटलेसे
मेघांनाही अनावरसे.

मेघ तरी कुठे भानावर ?
सैरभैर वाऱ्याच्याच
झुलणारे तालावर.

बघता बघता नेला वारा
पंखांनीच रानभर
दाही दिशांत घनगजर.

असे आजचे आभाळ !
दिशाभरून रानाचे.
रानभरून झाडांचे.

झाड भरून पानांचे
पानाएवढे फुलांचे
पंखांचे.
'तू' चे
आणि
'मी'चे.

# निष्पर्ण देठ

आल्या जुळून तारा, गेल्या झरून धारा,
पाण्यातल्या नभाचा पाण्यावरी पहारा.

राने तारलेली, शेते शहारलेली
क्षितिजास मोरपंखी घन दाट हुंगणारा

रंगांत भृंग गुंग, कळी पाकळी तुडुंब,
पानांवरी उन्हाचा उल्हास सांडणारा.

किल्बिलत पक्षी आले, झुलवून झाड गेले,
गुलमोहरात न्हाला निखळून सांध्यतारा

अंधारले नभात, गांधारले स्वरांत
हुंकारला तुझ्या त्या गीतातला इशारा

गाण्यातुनी मनाच्या का रे तळ्यात येशी ?
ओसंडशी असा कीं जावा फुटुन किनारा !

होते खुळीच तेव्हा कळले कसे न काही ?
निष्पर्ण देठ आता झुरतो झडुन फुलोरा !

# थडगे

माणसांनीच त्याला लाथाडले जेव्हा
तेव्हा त्याने थडगे जवळ केले;
माणसांनी ओकली आगच, तसे
फत्तराशी त्याने नाते जोडले.

दगड दगड ढासळणारा तरी
त्यातूनच तृणाने शोषले जीवन;
थडग्याचेही कोरडेपण खरेच तेव्हा
शेवाळून गेले चार–दोन क्षण.

त्याच्या नागड्या उघड्या पोरांनी
थडग्यालाच 'भोज्या' करून टाकले;
मायबाप भीक मागत तेव्हा
थडग्यानेच तान्ह्याला सांभाळले.

सायंकाळी परतून त्यांनी
भरली झोळी रिती केली;
त्यांतलीच कोरभर भाकर तशी
थडग्यालाही मिळून गेली.

# निष्पर्ण देठ

आल्या जुळून तारा, गेल्या झरून धारा,
पाण्यातल्या नभाचा पाण्यावरी पहारा.

राने तारलेली, शेते शहारलेली
क्षितिजास मोरपंखी घन दाट हुंगणारा

रंगांत भृंग गुंग, कळी पाकळी तुडुंब,
पानांवरी उन्हाचा उल्हास सांडणारा.

किल्बिलत पक्षी आले, झुलवून झाड गेले,
गुलमोहरात न्हाला निखळून सांध्यतारा

अंधारले नभात, गांधारले स्वरांत
हुंकारला तुझ्या त्या गीतातला इशारा

गाण्यातुनी मनाच्या का रे तळ्यात येशी ?
ओसंडशी असा की जावा फुटुन किनारा !

होते खुळीच तेव्हा कळले कसे न काही ?
निष्पर्ण देठ आता झुरतो झडुन फुलोरा !

# थडगे

माणसांनीच त्याला लाथाडले जेव्हा
तेव्हा त्याने थडगे जवळ केले;
माणसांनी ओकली आगच, तसे
फत्तराशी त्याने नाते जोडले.

दगड दगड ढासळणारा तरी
त्यातूनच तृणाने शोषले जीवन;
थडग्याचेही कोरडेपण खरेच तेव्हा
शेवाळून गेले चार–दोन क्षण.

त्याच्या नागड्या उघड्या पोरांनी
थडग्यालाच ‘ भोज्या ’ करून टाकले;
मायबाप भीक मागत तेव्हा
थडग्यानेच तान्ह्याला सांभाळले.

सायंकाळी परतून त्यांनी
भरली झोळी रिती केली;
त्यांतलीच कोरभर भाकर तशी
थडग्यालाही मिळून गेली.

थडग्याला साक्ष ठेवून तिने
संभोगाचे सोने केले;
डोळे मिटून त्याने सुद्धा
एक दिवस मिष्टान्न झोडले.

असे उभे मरण तो
जगत गेला–जगून गेला;
जगतानाच थडग तो !
मेला. आणि माणूस झाला !

# पहाटेच

एका हरवलेल्या कवितेच्या शोधात मन ?
की हरवलेल्या मनाच्या शोधात कविता ?

आज फक्त आठवते……
'निळ्या जांभळ्या मोरवनात तुझे डोळे गात होते.'

तूच गात होतास का गीत ?
की गीतच गात होते तुला ?

आज फक्त आठवते……
'पाझरणाऱ्या सांजवेळी एक फूल हंसत होते.'

तू हंसलास ते स्वप्न होते ?
की स्वप्नातलाच हंसलास तू ?

आज फक्त आठवते……
'पहाटेच पेटून धुके चंद्रमणी गळले होते.'

## अग्निफूल

घाव घालणे तुझ्या हाती असेल, असो बापडे !
हक्क मात्र माझाच असेल ना ह्या जखमांवर ?

मी जर माझी, रक्तही माझे, तर माझीच असेल वेदना !
अखेर व्रणधारीही मीच असणार, होय ना ?

कबूल मला. घाव घालशील तो क्षण तुझाच असेल,
तिथे थांबावेच लागेल तुला. आजन्म वाट पाहावी लागेल.

मी ? कुरवाळीन जखमा, जोजावीन गाऊन बाळगाणी.
शपथ ! कधी न कळू देईन त्यांना त्यांची कूळकहाणी.

बघता–बघताच रे कापरासारखे अवघे जीवन उडून सरेल
चितेवरचा एक व्रण अग्निफूल होऊन झुलेल.

# काळा निवान्त

एक बेभान शांतता
असहाय्य पाउले फरफटणारी;
काजव्यांची क्षीण सोबत
काळवंडूनच टाकणारी.

धास्तावून रातकीडे
बाराखडीत बडबडणारे;
दचकच–थांबत सावधतेने
काळे सरडे सरपटणारे

वाऱ्यानेही अंग टाकले आता
निमूट–निपचित डोळे मिटून,
एक काळा थंडगार
स्पर्श उभा फणा काढून.

श्वास रोखून झाडे स्तब्ध
नजर थारोळ्यात थिजणारी;
चित्कारत चिळकांड्यांच्या
कोसळणाऱ्या कमानी.

आता कोणत्याही क्षणी एका
पेटून निघेल आसमन्त,
एक श्वास . . . एकच भास . . .
आणि अन्ती काळा निवान्त . . .

# महानगर

कोंबडचा झुंझवाव्यात तसे त्यांनी पुतळे झुंजविले.
ओरबाडविले परस्परांस नि रक्तबंबाळ करविले.
पिसेही विस्कटविली त्यांची. तुरे समूळ उपटविले;
काळे फासून तोंडाला पायतणांनी भूषविले.
कुणाची पालखी मिरवली नि कुणाची अन्त्यात्रा !
पुतळे अस्वस्थ. सचित. कुणी कसा न उरला त्राता ?
त्या मध्यरात्रीच्या शोकसभेत जे अवघेच रडले धास्तावलेले
क्षितिजापर्यंत निमूट जाऊन त्यांनी देह विसर्जित केले.

दुसरा दिवस.
नगरातील सारेच पुतळे अदृश्य !
याचे जथ्थ्याजथ्थ्याने नगरवासी
नवल विशेष करू लागले
प्रथम कुजबुज
मग चर्चा
अखेर आरोप प्रत्यारोप.

'कुठे गेले ?'
'कसे गेले ?'
'का गेले ?'
'कुणी नेले ?'
'दडविले ?'
'की भ्रष्ट केले ?'

'एकूण पुतळे होते किती ?'
मग पुतळ्यांची शिरगणती.
'हे पुतळे कोणाचे होते ?'
एक कोवळा आवाज. लुकलुकत्या डोळ्यांचा.
निबर मने अवाक्. भूतकाळाचा संदर्भच नाकारणारी.
मग सारवासारव. रुक्ष हालचाल. वठलेल्या वृक्षासारखी.
सुरकुतलेल्या मुद्रेवर चिवट, ओशाळ, घोटीव हंसे,
नि मंत्रवत शब्द, आयुष्य खर्ची घालून मिळवलेसे.

"ते होते महात्म्यांचे पुतळे.
महात्मा म्हणजे महापुरुष.
महान म्हणजे थोरच.
अतिश्रेष्ठ...
म्हणजे... म्हणजे ..
पण पोरासोरांना ते उमजणारं नाहीये.
सारांश.
थोर म्हणजे आम्हीच–
आहोत जसे, तसेच असतात महापुरुष.
तस्मात्
आम्ही उद्याचे पुतळेच हं बाळांनो !
आजचेसुद्धा."
असे म्हणत एक म्हातारा धूर्त चपळाईने लटपटत,
पुतळ्यासारखाच उभा राहिला चबुतऱ्यावर थरथरत.

प्रतिष्ठित नगरवासीयांनी मग टाळ्या पिटल्या.
'टाळ्या पिटणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'
हे पंतोजीने पढवलेले सुभाषित उच्चरवाने गर्जून
त्यांनी त्या सजीव पुतळ्याचा जयजयकार केला.

त्याचे झेंडे उच उंच उभवीत—
ते हर्षातिशयाने नाचू लागले.

मग हळूहळू
त्यांच्यातील प्रत्येकच धिटाईने सावध सरकत
एकेका चबुतऱ्यावर उभाच राहिला.

तात्पर्य.

आता त्या महानगरात
फक्त पुतळेच उरले आहेत !

## गाथा

एकेक फूल ढळताना
एकेक साज उतरावा,
एकेक मूळ तुटताना
एकेक प्राण विझवावा.

एकेका हाकेवरती
एकेक व्यथा रुजवावी,
एकेका वळणावरती
एकेक कथा बुजवावी.

एकेक जन्म मांडुनी
एकेक खेळ उधळावा;
कुणी पांथस्थाने गाथा
हा जाता जाता गावा.

त्याचे झेंडे उच उंच उभवीत–
ते हर्षातिशयाने नाचू लागले.

मग हळूहळू
त्यांच्यातील प्रत्येकच धिटाईने सावध सरकत
एकेका चबुतऱ्यावर उभाच राहिला.

तात्पर्य.

आता त्या महानगरात
फक्त पुतळेच उरले आहेत !

# गाथा

एकेक फूल ढळताना
एकेक साज उतरावा,
एकेक मूळ तुटताना
एकेक प्राण विझवावा.

एकेका हाकेवरती
एकेक व्यथा रुजवावी,
एकेका वळणावरती
एकेक कथा बुजवावी.

एकेक जन्म मांडुनी
एकेक खेळ उधळावा;
कुणी पांथस्थाने गाथा
हा जाता जाता गावा.

# चंद्रकंस

चद्रकंस गात गात मी प्रियास शोधितो.

रिक्त मेघ धवल तरल क्षितिजपार जाहले
उंच उंच मोकळेच नभ निवांत थांबले;
पाचूचे रंग काचपाण्यातुन सांडती,
शीळ निळाईत भरत पवन गंध वेचिती.
शारदीय चांदण्यात एकाला उदासतो.

काय तू दिलेस स्पर्श चंदनास पेटत्या ?
श्वासही दिलेस धुंद पारिजातकास त्या ?
तू जिथे, तिथेच लाख चांदण्या प्रकाशती,
पाहता वळून सहज, मनमयूर नाचती.
आळवीत अंतरात चंद्रदीप लावतो.

तू माझे स्वप्न एक लोचनांत रोखिले.
स्वर्गीचे गीत मधुर मी स्वरांत चुंबिले.
फूल तूच हंसताना पाकळ्यांत हरवले.
माझिया नभात पूर्ण चंद्रबिंब हासले.
हाय ! भास हा कशास जगवितो नि जाळितो.

# कुणि पाहिलेच नाही

ओटीत वेचलेली हिरमूसली फुलेही
आलास ना कधीही ती हासलीच नाही.

होऊन पाठमोरा वारा निघे वनात
त्याने वळून मागे ना पाहिलेच काही.

चोंचीत गोड गाणी वेचीत थांबलेली
झटकून पंख गेली घरट्यांत पाखरेही.

पदरावरी जरीचे जडले मयूर दोन
फुलवूनिया पिसारा ते नाचलेच नाही.

ओठंगुनी कधीचे ओठांत गीत राहे
त्याला तुझ्या स्वरांचे ना पंख लाभलेही.

कंठात हुंदकाही दाटे भरून डोळे
गेले सुकून आसू कुणि पाहिलेच नाही.

# जुळलेत कधीचे धागे

जुळलेत कधीचे धागे  म्हटलेंस कितीही नाही,
हांसऱ्या फुलांतुन वारा  गंधाची फिरविल द्वाही.

पाहू नकोस वेडया,  त्या डोळयांत झुरे सारंग
स्पर्शांत उमलली कमळे  रोमांचांतून तरंग.

बोलू नकोच आता तू  शब्दही फितुर झालेले,
ओठांवर गोठविले ते  सूरांतुन पालवलेले.

होऊन पाठमोरा  का  जाशील कसा कोठे तू ?
पाहशील जेथे तेथे माझीच रूपरेखा तू !

वेगळे वेड हे का रे ?  आगळा आजचा नूर ?
सावल्याहि कातरवेळी कुजबुजती मनीं काहूर !

का फिरून फिरून  डोळेही येती  भरभरून बाई ?
अंधारून आले आता,  परतीची कर ना घाई !

## धुंद ही हवा

धुंद ही हवा
मंद गारवा
आज तू मला हवास माझिया जिवा

जळ निळे निळे
माळ जांभळे
केशरी नभात चंद्र आज पारवा.

झनन झांजरा
पवन बावरा
दरवळून राहिला स्वरांत मारवा.

गर्द नी फिके
दरितले धुके
तरंगतो धुक्यात नि जळात गोडवा.

लवत अंबर ऽ
झुलत झुंबर ऽ
बांध प्रीतिच्या नभात आज चांदवा.

# त्रिवार नाही

ही आर्जवे कशाला ? वचने दिली कितीही
आता फिरून मागे  वळणे त्रिवार नाही.

लागे जिथे फुलांना  काटचांत मोहरावे,
ते हुंदके कळचांचे  सहणे त्रिवार नाही.

बंदीच सक्त उडण्या-गाण्यास पाखरांना,
वठलेत वृक्ष फिरुनी  फुलणे त्रिवार नाही.

वाटा उठून गेल्या  विसरून सावल्यांना,
जे उन्मळून गेले,  रुजणे त्रिवार नाही.

डोळचांत डोह काळे  ओठावरी निखारे,
घाटावरी सुखाच्या  जळणे त्रिवार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २५२८
ता. क्र. २२६५७
शाखा (स्थळ प्रत)

# वेदनांचा वेद

वेदनांचा वेद झाला यातनांचा यज्ञ रे
मी कधी येऊ दिला ना पापणीला पूर रे.

रंग गेले उडुन वेडे फूल मागे राहिले,
फूलपंखी गंधगाणे त्यास कुणि ना गायिले
गळत असता पाकळ्या मी घट्ट मिटले ओठ रे.

कंठ थकला, शब्द अडला उठुन गेली मैफल,
उडुन गेली दशदिशांना पारवरेही चंचल
ढळत असता ताल तुटला ना कधी मनबंध रे.

पांगणाऱ्या सांध्यछाया दूर गेल्या दूर रे,
वाहत्या वाऱ्यात विरले जिवलगांचे सूर रे.
बुडत अंधारात गेले चांदणे चुंबून रे.

तू दिले ओठांस हासू लोचनी आसू दिले.
जीवना तू जे दिले ते हासुनी मी मानिले,
मी उभी वणव्यात जळते गीत जुळते गात रे.
मी कधी येऊ दिला ना पापणीला पूर रे !

[library stamp]

# गुणगुणून

गुणगुणून कोण इथुन गेलेले ?
घमघमून गेंदगेंद झुकलेले !
झणकारून मिटलेली पंखझांज,
सरसरून ओथंबून सोनसांज.
लवथवते गर्दसर्द पानपान,
थरथरते वृक्षांवर स्पर्शभान.
भरभरून मेघभार कोसळले,
क्षितिजावर रिक्त व्योम हंबरले.
हळव्या लडिवाळ पाकळ्यांत गात,
एक स्वप्नधून झुलत संभ्रमात.
हिंदोळत तालबद्ध गंधखूण.
प्राणाप्राणांत आज चंद्रऋण.
खळखळून कोण हंसून गेलेले ?
विरघळून इंद्रधनू ओघळले.

# प्रतीत

'तू आम्हास शब्द दे
आम्ही तुला स्वप्न देऊ,
अशा घोषणा करीत
फुलांचे झेंडे मिरवीत
ते सर्व बघता बघता
माझ्या दाराशी आले.

त्यांत एक हळवा डोंगर,
फेसाळ वादळी लाटा,
निळाई वेढलेली झांजर झाडे
अन् पंखात धुके अडकलेली
अनोळखी पाखरे होती.

आणि त्यांच्यामागेच दूर......दूर
त्यांच्यातीलच. असून नसणारा.
हाताची घडी
हंसतमुख.
प्रश्नचिन्हासारखा—
तो उभा होता.

मी !
स्तब्ध.......
अस्वस्थ.
विचाराधीन
संभ्रमात
शब्द स्वप्नांनी

वा स्वप्न शब्दांनी तोलीत,
उभीच.

साशंक डोळे पापण्यांत लपवीत.
आणि त्याचे ते
ओठांनाही नकळत डोळ्यांतून हंसत राहणे—
न्याहाळीत मी उत्तरले.
'ठीक आहे.'

अन् क्षणार्धात
ओटीतले शब्द उधळून देऊन
मी रस्त्यावर.
माझे शब्दघर मोडून.
व्यस्त.
उद्ध्वस्त.
अस्तमान.

शब्दांचे तुरे मिरवीत
ते परतणीवर क्षितिजाकडे.
धुळीत सांडलेली स्वप्नलोलके न्याहाळीत
मी नतमस्तक.

आणि तो ?
तसाच.
तेथेच.
उभाच
स्वप्नांचे स्वप्न
असा
प्रतीत.

# युगान्त

परस्परांवर तीक्ष्ण वार करीत
त्यांनी जखमांचा चिखल केला.
रक्त प्राशिले नाही एवढेच–
फक्त पाट वाहविला.

धरणीचेच वासे फिरले, तसे
घर घरास अनोळखी झाले;
डोंब उसळताच द्वेषाचे
आकाश अशक्त होत गेले.

सारेच जायबंदी रणांगणावर
छाती पिटीत, तीही पिचलेली;
आक्रंदत राहिली शरीरे
झुंजून झुंजून उसवलेली.

ओठ सुकल्यावर पश्चात्तापदग्ध
ते हळूहळू लागले हळहळू;
परस्परातच महात्मा संशोधून
लागले स्तुतिचिकट लाळ गाळू.

तेव्हाच अंधारून आले होते
आभाळाच्या पाकळ्या मिटून गेल्या !
एका वज्रकठोर पंजाने काळाच्या
अवघ्या आकृती पुसून टाकल्या.

# वस्ती

‘थडग्यांची वस्ती उठवून
झोपडयांची वस्ती वसविण्याचा
त्यांनी निर्णय घेतला.’
हे असंख्य कृमिकीटकांनी
थडग्यांतील आत्म्यांना सांगितले–
वळवळणाऱ्या.

तेव्हा खडबडून जागे झालेल्या त्यांनी
आपली फुटकळ हाडे जुळवून घेतली;
आणि ते बाहेर पडले
आपले दगडी महाल फोडून.
दात विचकून, नसलेले.
ते खदखदून हसले–
ओठ झडलेले;
तेव्हा दिशाही करपल्या.
ती सांगाडयांची वरात
हळूहळू अंधारात बुडून गेली.
मात्र बुडताना त्यांनी निक्षून बजावले
‘ही थडग्यांची वेस कधी ओस पाडू नका.’

थडग्यांची वस्ती जाऊन तेथे
मग झोपडयांची वस्ती झाली.
( म्हणजे पुन्हा थडग्यांचीच ! )
तेव्हा त्या सुतकी रस्त्यावर
एक सार्वजनिक दिवा लागला.
म्हणून बरे झाले !

तिथल्या पुरुषांना आपल्या नसल्या
तरी बाया ओळखू येऊ लागल्या.
सारेच विषय मिटून
इंद्रिये अर्थशून्य झाली,
तरीही
झोपडी-झोपडीत स्त्री होती,
पुरुषार्थ होता.
पाळण्या पाळण्यात मूल होते,
पुरुषत्व होते.

लूपवाले त्यांनी कधीच पिटाळून लावले होते.
मात्र
मिळणाऱ्या अन्नानुसार आपल्या जठरांना-
आकार देण्याच्या संस्कृतीचा,
आणि
मिळतील त्या कपडयांच्या मापाने
अंगे बेतण्याच्या कलेचाही,
त्यांनी आपल्या पोरांना वारसा दिला.

एका संध्याकाळी
वणवणणाऱ्या
त्यांच्या पोरांनी वर्दी दिली.
झोपड्यांची वस्ती उठवून–
बंगल्यांची वस्ती वसविण्याच्या
त्यांच्या निर्णयाची.

तेव्हा आपल्या झोपड्या
आपल्याच हातांनी जाळून
ते हंसले. दात असलेले.
तेव्हा दिशांचे दातवण झाले.

ती सांगाड्यांची वरात
हळूहळू अंधारात बुडून गेली
मात्र
बुडताना त्यांनी निर्वाणीचे बजावले
'ही थडग्यांची वेस कधी ओस पाडू नका.'
मग तेथे टुमदार बंगल्यांची वस्ती झाली !

# तोवर

अलगद अलगद जलद गडद
झुलत असतील नभात;
पापणीखालील डोह गहन
तोवर भरून ठेव.

बहरून बहरून झाड जाईल
हरवून पानांफुलांत;
खांद्यावरील स्पर्शफुले
तोवर जपून ठेव.

शीळ घालीत फिरेल वारा
हळव्या डोंगरदऱ्यांत;
ओठांवरील शब्द सुरांत
तोवर झुलवीत ठव.

उमलून येईल क्षितिजफूल
एक दिवस दिशांत;
प्राण पहाटतील प्रगाढ–
तोवर जगून ठेव.

# पूर्णविराम

पानांच्या हिरव्या लाटा ओसरून
परतलेल्या ओहोटीसरशी,
फुलांचेही बहर कोळपून
झाडे अगदी उघडी–वाघडी

कोरडया मनाने आदळणाऱ्या
वांझ फांद्या जशा झांजा,
निष्प्राण रक्तक्षयी अवघाच
बरगडयांचा मरणसोहळा

काष्ठशिल्पाच्या शिखरावर ह्या
कुंडली मांडून घार मग्न;
फाटयारेघोटयांतून उमटणारे
भविष्याकार चिरपरिचित अज्ञ.

उन्हाचे वाळवंट वाहू लागलेले आता.
वारा क्षितिजावर तडकलेला,
अखेरच्या मुक्कामावर मावळताना
एक विरागी पोहोचलेला.

अज्ञात ग्रंथाच्या अंतिम पानावर
अंतिम पूर्णविराम विसावलेला.

## आकाशाच्या अभिप्रायार्थ

निराकार आकाशाला आकारत उंच उंचच-
झेपावणारे कलशाकार प्रदक्षिणांत वेढीत
कोसळणाऱ्या पाखरांचे हिंदकळते स्वर
अंधार गिळणाऱ्या हिरव्या बारवेकडील
ओवरीतील उद्ध्वस्त कोपऱ्यात तळपणाऱ्या,
दबून श्वापदासारख्या बैराग्याच्या रोखलेल्या
बुंद डोळ्यांच्या बुलंद संगिनी.

गाभाऱ्यातील दगडी मखरावरील करड्या-
वेलबुट्टीच्या आडोशाने अंग चोरून उभी ती.
थरथरत, भोळीभाबडी, व्याकुळ रानहरिणी जशी.
अवेळीच्या वादळवाऱ्याने उन्मळून गेलेली कर्दळ.
बकुळीची अश्राप फुले वेचता वेचता
वेचत गेलेली स्वतःलाच, बोलताना स्वतःशीच
दचकून पाहणारी, विजेच्या लखलखाटातील
काजळछाया.

भगव्या कफनीची. कमंडलूची. आणखी कशाची.
आता मात्र आर्त आरतीच झालेली.
पाहात राहणारी एकटक हरिण डोळ्यांनी
बैराग्याच्या पिसाट नजरकैदेत विझत जाताना
मिणमिणत्या मूर्तीच्या साक्षीने.

अवचितच अवकाश चिरफाडत जाणारा एक चित्कार.
झाडांवरील पाखरेही झडझडून उडालेली दिशांनी भिन्न.
उतरणीला लागलेला घाट अवाक्. हताश. सुन्न.
थिजलेल्या नदीकाठच्या वृक्षांचे रोखलेले श्वास खिन्न
अन् दूर डोंगरावर तडकलेले आभाळ काळेकभिन्न.

पलीकडील घाटावरील दयाघन देवळातील
एका भाविकाने अभावितपणे आरंभलेल्या–
घंटानादाची नीरव शांततेतील द्रुतलय.

आरती सरताच सरसरत उंचावत जाणारी
एक रक्तबंबाळ किंकाळी कलशाकडे;
त्यास प्रदक्षिणांत कवळून, धाय मोकलून,
असहाय्य. हताश. तिथून पुढे–
उंच उंचच जाणारी
निर्विकार आकाशाच्या अभिप्रायार्थ.

# शिशिरान्ती

शिशिरान्ती परतणारे बर्फवादळ अटळ
अस्थिपंजर हातांनी नका रोखू हे झाडांनो;
हिरवे संदर्भ गळताच जगणे जमेल न जमेल
थोडी वादळाशीही दोस्ती असू द्या गडयांनो.

वळून वळून पानांनो तुम्हीसुद्धा पाहू नये.
फोलकटांनी पिवळया गळून खत व्हावे हेच बरे !
धडधडेल ऊर तसे फडफडतील प्राण थोडे-
पण मागीलांचे पायरव खचित ऐकू येतील पुढे.

पाखरे पांगली कधीचीच बहरलेल्या दिशांनी
उसवलेल्या सताड घरटयांत दिवाभिते अनिर्बंध;
पिसाट वारे घोंघावत शोधीत जाईल आरपार
हरवलेल्या श्वासांचे भासही होतील बेबंद.

पानगळीत पहिल्याच पानाची सम साधून,
सोडवून लडिवाळ वेलींचे हिरवे कोडे;
जाल करडया प्रदेशाच्या झुंजुमुंजू सीमेवर. पुढे-
किंचित अडले, तरी उधळतील पाच घोडे.

तेव्हा भूमिगत मुळांतून चिवचिवणारा अंकुर
हुंकारून गर्भातच सूर्यसाक्षीने डोकावेल;
उसळेल त्यातून एक जीवट देठ थेट. माथ्यावर–
फूल हेच सनातन गाणे गुणगुणेल.
'पावसा ऽ पावसा ऽ ये ऽ रे ऽ.'

# त्या पिंपळपाराभवती

त्या पिंपळपाराभवती
भोवंडुन गेला वारा
दचकून निखळुनी गेला
कुणि हळवा सायंतारा.

काळोख चाटुनी पाने
फडफडुनी झडुनी गेली,
मिटलेल्या दारापुढती
कोवळी केळ अवघडली.

शिरि काळोखाचा भार
हाकारत जाय अवेळी
परि घराघराने केली
जणू अळी मिळी गुपचिळी.

तिज कुणिही दिली ना साद
डोळ्यांत दाटले पाणी
पाण्यात उभीच ती गात
त्या मंतरलेल्या रानी.

गाण्यात चंदनी मेणा
मेण्यातुन राजसवन्सी
मांडिला तयाने खेळ
गाणाऱ्या जळराणीशी.

वेणीतुन गळले फूल
भाळावर रुतला पक्षी
वक्षांवर चंद्रफुलांची
रेखिली तयाने नक्षी.

ओठांवर जडले ओठ
प्राणांत कर्पुरी वेणा
कुजबुजता घाट जरासा
तो लगबग गेला मेणा.

ती अजून येते जाते
तळरानी गाणे घुमते
पाण्यात राजहंसाचे
प्रतिबिंब डहुळुनी जाते.

# तुम्हाला कोणते गाणे गाऊ पाखरांनो

तुम्हाला कोणते गाणे गाऊ पाखरांनो
परतफेडीत दिवस कलताना आत्मभोर ?
कसे गडे उतराई व्हावे फुलांनी, ऋण-
किरणांचे पाकळयांत टपोर बिलोर ?

किती भिरभिरून पंखांवर वाहून आभाळ
निळी नवलाई डोळयांत आलात भरून !
पहाटण्यापूर्वीच पहाटून अनश्रुत
सूर वेचीत आलात कुठून कुठून !

आभाळाचे गर्मरेशमी रंग लुटून, तुम्हीच-
पुरविलेत डोळयांचे डोहाळे खुळे,
किलबिलत कोवळे कोंभ अंकुरत जेव्हा-
हया डोळयांनीच भोगले ते जन्मसोहळे.

कशी काडी काडी जमवून तुम्ही माडी रचली !
मखमली घरटी बघता बघता हळवी झाली.
माझे हंसणे, माझे बोलणे, माझे सर्व सर्वच-
धून हलकीशी त्यांत तुम्हीच भरून दिली.

हिंदोळताना डहाळी मी अंगाई गात राहिले,
जांभळी नीज पांघरून मग झाडही निजले.
दूरातल्या वाऱ्यावरून परागसर अलगद
स्वप्नांच्या वाटेने बंद डोळ्यांत उतरले.

आता झाडही वठले......सावल्या जडावल्या......
मुळे ठोकरली मातीनेच भावबंध तोडून
पाने उसवली वादळाची चाहूल लागताच–
कुठे निघालात मागे शून्यता रचून ?

तुम्हाला कोणते गाणे गाऊ पाखरांनो
परतफेडीत दिवस कलताना आतमभोर ?
कसे गडे उतराई व्हावे फुलांनी ? ऋण–
किरणांचे पाकळ्यांत टपोर, बिलोर.

REFBK-0024647
REFBK-0024647

म. ग्रं. सं. ग्रंथालय ठाणे
२५२८
दा. क्र. ९७६४८
काव्य
ग्रंथ शाखा स्थळ